Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १२ ] गुरूवार ते बुधवार, मे ६-१२, २०२१/वैशाख १६-२२, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४०.

**अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार यवतमाळ शहराचे मंजूर विकास योजना (सुधारीत) मधील फेरबदलाबाबत.**

क्रमांक यनप-न.र.-२७५-२०२०-२१.—

यवतमाळ शहराची सुधारीत विकास योजना शासनाचे नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टिपीएस-२७९५-१६००-सीआर-२५२-९५-युडी-१३, दिनांक ८-७-१९९८ अन्वये भागाशः मंजूर केले असून दिनांक ४-९-१९९८ पासून अंमलात आली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) च्या तरतुदीनूसार यवतमाळ नगर परिषदेने सर्व साधारण सभा ठराव क्र. ०२, दिनांक ८-२-२०२१ अन्वये उक्त मंजूर विकास योजनेमध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करण्याचे ठरविले आहे.

उक्त विकास योजनेतील मौजे पिंपळगाव मधील शेत सर्व्हे नं. ५५/१ मधील ०.८७ हे. आर क्षेत्रफळाची शेतजमीन आरक्षण क्रमांक २१ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र. २७ ग्रंथालय, सांस्कृतिक भवन व नगर भवन या दोन्ही आरक्षणाने बाधीत होत असलेली जमीन आरक्षणातून वगळून निवासी/रहीवासी विभागात समाविष्ट करण्यात यावी.

वरील प्रमाणे फेरबदल दर्शविणारा मंजूर विकास योजना (सुधारीत) चा भाग नकाशा, नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पहावयास उपलब्ध आहे. या फेरबदलाबाबत कोणतीही सूचना अथवा आक्षेप असल्यास ही जाहिर सूचना " शासन राजपत्रात " प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत मुख्याधिकारी नगर परिषद, यवतमाळ यांचेकडे लेखी स्वरूपात सादर करावयात. मुदतीत प्राप्त झालेल्या सूचना अगर हरकतीवर उपरोक्त प्रस्ताव नगर परिषद कडून शासनास मंजुरीकरीता सादर करण्यात येईल.

**सौ. कांचन श्रीकांत उर्फ बाळासाहेब चौधरी,**
नगराध्यक्ष,
नगर परिषद, यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक २८ एप्रिल २०२१.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४१.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Proposed Modification Under Section 37(*1*) of The Maharashtra Regional And Town Planning Act, 1966 In The Development Plan Of Yavatmal (Revised).**

No. YMC-T.P.-275-2021.—

The Development Plan of Yavatmal (Revised) has been partly sanctioned by the Government in Urban Development Department *vide* Resolution No. TPS-2795-1600-CR-252-95-UD-13, dated 8-7-1998 and came into force *w.e.f.* dt. 4-9-1998.

As per the provisions of Section 37(*1*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966. The Municipal Council Yavatmal *vide* its General Body Resolution No. 2, dated 8-2-2021 has resolved to make following modification in the sanctioned Development Plan (Revised) of Yavatmal.

The Land of Survey No. 55/1 of Pimpalgaon admeasuring 0.87 H. A. Which is reserved in both site No. 21 Primary School and Play Ground and in site No. 27 Library, Cultural Centre and Town Hall shall be deleted and included in Residential Zone.

The part plan of sanctioned Development Plan showing the above modification is kept open for inspection by the public in the Office of the Municipal Council Yavatmal any working day.

The suggestions and objections on the above proposed modification from any person shall be received by Chief Officer, Municipal Council, Yavatmal within one month from the date of publication of the notice in the “ Maharashtra Government Gazette” will be considerd before submitting in to Governement for sanction.

Mrs. KANCHAN SHRIKANT *alias* BALASAHEB CHOUDARY,
President,
Municipal Council, Yavatmal.

Yavatmal :
Dated the 28th April 2021.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिध्द झालेली आहे.**

**७**

**मंगळवार, एप्रिल २७, २०२१/वैशाख ७, शके १९४२**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २०.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कक्ष-६-नपाप्र-अका-कावि-१११-२०२१.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ (४) मधील तरतुदीनुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जितेंद्र पापळकर भा.प्र.से., जिल्हाधिकारी, अकोला या प्रकटनाद्वारे जाहीर करतो की, दिनांक ०९-०३-२०२१ (मंगळवार) रोजी अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूर नगरपरिषद व दिनांक १५-०३-२०२१ (सोमवार) रोजी बार्शिटाकळी नगरपंचायतीच्या उपाध्यक्ष पदासाठी घेण्यात आलेल्या विशेष सभेत खालील अनुसूचीचे स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या नगर परिषद/नगरपंचायतीकरिता त्यांच्या नावासमोर स्तंभ (३) मध्ये नमूद केलेले उमेदवार हे उपाध्यक्ष म्हणून निवडून आलेले आहेत.

**अनुसूची**

| अ. क्र. | नगर परिषद/नगरपंचायतीचे नांव | निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नांव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मुर्तिजापूर नगरपरिषद | श्री. सुनिल महादेवराव पवार |
| २ | बार्शिटाकळी नगरपंचायत | श्री. सुरेश सुखदेव जामनिक |

**जितेंद्र पापळकर** (भा. प्र. से.),
जिल्हाधिकारी,
अकोला.

अकोला :
दिनांक १६ एप्रिल २०२१.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २१.

BY COLLECTOR

*ORDER*

No. Desk-6-NPP-AK-WS-111-2021.—

As required under Section 51-A(*4*) of the Maharashtra Municipal Coucils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965. I, Jitendra Papalkar I.A.S., Collector, Akola hereby publish names of Vice-President of Municipal Council, Murtizapur and Nagarpanchayat, Barshitakli for which the election have been held on 9th March 2021 (Tuesday) and 15th March 2021 (Monday) as shown below Schedule in Col. No. (3) is elected for the Municipal Council and Nagarpanchayat shown in the Col. No. (2).

SCHEDULE

| Sr. No. | Name of Municipal Council/ Nagarpanchayat | Name of the Vice-President who is elected |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Murtizapur Municipal Council | Sunil Mahadeorao Pawar |
| 2 | Barshitakli Nagarpanchayat | Suresh Sukhdeo Jamnik |

JITENDRA PAPALKAR (I.A.S.),
Collector,
Akola.

Akola :
Dated the 16th April 2021.

————

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २२.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कक्ष-६-नपाप्र-अका-कावि-११०-२०२१.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २०(१) मधील तरतुदीनुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी, जितेंद्र पापळकर भा.प्र.से., जिल्हाधिकारी, अकोला या प्रकटनाद्वारे जाहीर करतो की, दिनांक १७-१२-२०२० (गुरूवार) रोजी अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापूर नगरपरिषद व दिनांक ०४-०१-२०२१ (सोमवार) रोजी तेल्हारा नगरपरिषदेच्या नामनिर्देशित सदस्य पदासाठी घेण्यात आलेल्या विशेष सभेत खालील अनुसूचीचे स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या नगर परिषदेकरिता त्यांच्या नावासमोर स्तंभ (३) मध्ये नमूद केलेले उमेदवार हे नामनिर्देशित सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत.

**अनुसूची**

| अ. क्र. | नगर परिषदेचे नांव | निवडून आलेल्या नामनिर्देशित सदस्यांचे नांव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मुर्तिजापूर | श्री. सुनिल ताराचंद लशुवानी |
| २ | तेल्हारा | श्री. धनंजय निळकंठराव मार्के |

**जितेंद्र पापळकर** (भा. प्र. से.),
जिल्हाधिकारी,
अकोला.

अकोला :
दिनांक १६ एप्रिल २०२१.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २३.

BY COLLECTOR

*ORDER*

No. Desk-6-NPP-AK-WS-110-2021.—

As required under Section 20(*1*) of the Maharashtra Municipal Coucils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965. I, Jitendra Papalkar I.A.S., Collector, Akola hereby publish names of Nominated Counsillors of Municipal Council, Murtizapur and Telhara for which the election have been held on 17th December 2020 (Thursday) and 4th January 2021 (Monday) respectively as shown below Schedule in Col. No. (3) is elected for the Municipal Councils shown in the Col. No. (2).

SCHEDULE

| Sr. No. | Name of Municipal Council | Name of Nominated Councillor who is elected |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Murtizapur | Sunil Tarachand Lashuwani |
| 2 | Telhara | Dhananjay Nilkanthrao Marke |

JITENDRA PAPALKAR (I.A.S.),
Collector,
Akola.

Akola :
Dated the 16th April 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.